# राशिभविष्य - जानेवारी, २०२२.

**दादा दामले(dadadamle@gmail.com)**

==========================================================

**हे नवे वर्ष आपणांस,आपल्या सर्व कुटुंबियांस व मित्रपरिवारांस आरोग्यसंपन्नतेचे, सुखसमृद्धीचे आणि उराशी बाळगलेली स्वप्ने साकार करणारे असे सिद्ध होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !**

==========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या-त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला**

**तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे**

**निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी वक्री हर्षल असून त्याच्यामुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी, कोणाचाही धाक, दडपण असह्य होणारा असा झाला असेल ना ? या राशीची लहान मुले तर हूड, व्रत्य, खोडकर अशी झाली असण्याची शक्यता दिसते. असे असले तरी येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. पण तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती होणे, यश मिळविणे शक्य होणार नाही. या राशीच्या द्वितीय स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच कौटुंबिक जीवनात मतभेद, वाद, भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतू व मंगळ असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी जात आहे. त्यावेळी शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप, मनोभंग होणे संभवते. मंगळामुळे अनारोग्य, मूळव्याधीसारख्या उष्णताविकारांचा त्रास, हाडमोड होणे, खूप

कष्ट-परिश्रम करावे लागणे संभवते. त्याशिवाय या मंगळामुळे वीज, पाणी यांपासून धोका संभवतो. जपा. असे काही घडल्यास नैराश्य येईल. येथील केतूमुळे कौटुंबिक जीवनात कलह होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. त्याशिवाय काही मंडळींना त्वचा रोग, रक्तविकार, मुखदंत रोग अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. भाग्यस्थानी धनु राशीत रवि व शुक्र हे दोन ग्रह आहेतच. रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल; व त्याच्यामुळे भय, निराशा, मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात व्यावसायिक दृष्ट्या अनुकुल होईल. आर्थिक लाभ होईल, काही मंडळींना मान, प्रसिद्धी, कीर्ती मिळू शकेल. भाग्यस्थानी असलेल्या शुक्रामुळे परिस्थितीत सुधारणा होईल. काही मंडळींना गुरुकृपा, काहींना सुसंगती, थोरकृपा, सुखसमाधान लाभेल. ऐषाराम मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत बुध व शनि हे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. बुधामुळे मानसिक, कौटुंबिक सुख लाभेल व आर्थिक लाभ होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात दशम स्थानी रविसह शनि असल्यामुळे काही अविस्मरणीय घटना घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, काहींना वाहनसुख लाभेल, धनलाभ होईल, विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करता येईल, नवे मित्र मिळतील. पण नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, घोटाळे, अर्थलाभास विलंब होणे संभवते. तसेच कुमार्गी मित्रांपासून त्रास होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल.जपा. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची व श्रीहनुमानाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर श्रीगणेश अथर्वशीर्षाचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून

श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी " ओम अश्विनी कुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू असून त्याच्यामुळे सतत मनाविरुद्ध व अपमानास्पद वाटणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे सूडबुद्धी जागृत होईल. जपा.

त्याशिवाय या राहूमुळे या राशीच्या काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतू व मंगळ असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसायात आहे त्यांच्या व्यापार-व्यवसायात गैरसमज, संशय, मतभेद अशापैकी कारणांनी बाधा निर्माण होणे संभवते. त्यामुळे, मनस्थिती अस्वस्थ, अस्थिर राहील. जपा. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत जात आहे. त्याशिवाय या अष्टम स्थानी प्रथमपासून रवि व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात रवि -मंगळ प्रतिकुलच होतील. रवि-मंगळामुळे अनारोग्य, दुःख, अपयश, संततिसुखात बाधा येणे संभवते. मंगळामुळे जल-वीज यांपासून धोका असल्यामुळे विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी आलेल्या रविमुळे मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध, भय यामुळे मनस्थिती निराश होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी प्रथमपासून बुध व शनि असे दोन ग्रह आहेतच. बुधामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे दिरंगाई निर्माण होणे संभवते. तसेच कारण असो, नसो भांडणे होणेही संभवते. शनिमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून ज्यांचे बौद्धिक किंवा शास्त्रीय संशोधन व्यवसाय क्षेत्र आहे त्यांना हा गुरु अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. क्वचित कोणास मानसन्मान प्राप्त होणेही संभवते. काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. येथील नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे सांपत्तिक अडचणी निर्माण होणे संभवते. तसेच काहींना जिवावरच्या प्रसंगाला सामोरे जावे लागेल. तसेच अकारण शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची व श्री हनुमानाची उपासना मनःशांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर श्रीशिवलीलामृत स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम

ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन** - या राशीच्या व्यय स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण येथील राहूमुळे या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाचा योग येईल. तसेच काही मंडळींना अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतू व मंगळ असे दोन ग्रह असून येथील मंगळ अनारोग्यकारक होईल व त्यामुळे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. इजा होणे, अंगावर फोड येणे, ताप येणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. पण केतूमुळे अनारोग्याचा फारसा त्रास होणार नाही असे वाटते. त्याशिवाय काही मंडळींना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. तसेच चोरी झाल्यास आर्थिक नुकसान होण्याचीही शक्यता आहे. जपा. पण येथील केतूमुळे आचारविचार उच्च प्रकारचे होतील, मन उदार व बुद्धी गुणवान होईल. क्वचित कोणास कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत जात आहे. त्यावेळी जीवनसाथी /संगिनीचे अनारोग्याची चिंता त्रस्त करील. वैवाहिक जीवनात गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागेल. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी वाद, गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या सप्तम स्थानी प्रथमपासून रवि व शुक्र आहेतच. येथील रवि केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होण्याची शक्यता आहे. पण या रविमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. दुःख, अपयश, अनारोग्य, संतति सुखात बाधा येणे संभवते. जपा. या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे अपेक्षाभंग होणे, मोठा आजार होणे, असमाधानकारक घटना घडणे संभवते. तसेच शनिसह असलेला बुध मात्र अनुकुल होईल व काही मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अध्यात्माची आवड असणारांना अनुकूल होतील. नेपच्यूनमुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. गुरुमुळे सद्गुण

वाढतील, प्रवासाचे योग येतील, काहींना प्रसिद्धी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून नियमित असे काही घडणार नाही. मित्रांशी वाद, भांडणे होतील. पण अर्थलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर "दुर्गादेवी स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्या

मंडळींचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नम::" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे

त्यांनी "ओम नम:: शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नम::" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू व मंगळ असे दोन ग्रह असून संततिसुखाचे दृष्टीने हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील. केतूमुळे पोटविकाराचा आजार .त्रस्त करील. मंगळामुळे उष्णताविकार बळावतील. त्याशिवाय संततीपैकी कोणाच्या अनारोग्याचा किंवा बेताल आचरणाचा मनस्ताप सहन करावा लागेल. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्येचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात तो अधिकच अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे रक्तविकार, हृदयविकार असणारांना असह्य त्रास होईल. काही मंडळींना इजा होणे, ताप येणे अशापैकी आजार होणे संभवते. त्याशिवाय आर्थिक नुकसान होणे, अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागणेही संभवते. जपा. या षष्ठ स्थानी रवि व शुक्र असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. . रवि दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील. मन:शांती लाभेल. पण शुक्र ग्रहामुळे उच्च गुण असूनही त्यांचे प्रकटीकरण करण्यास संधीच मिळणार नाही. मनात प्रेमभावनाही असणार नाही. कामुकता वाढेल व त्याचा परिणाम म्हणून काही गुणवंत एखाद्या व्यसनाच्या आहारी जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्याशिवाय काही मंडळींवर कसला तरी आळ येणेही संभवते. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत जात आहे. त्यावेळी तो केंद्रातील रवि होणार असल्यामुळे भाग्योदयकारक होईल. या सप्तम स्थानी असलेले बुध व शनि असे दोन ग्रह आहेतच. येथील बुधामुळे भांडणे होतील व दु:ख सहन करावे लागेल. शनीमुळे शांत,विचारी वृत्ती वाढेल; पण त्याच्यामुळे

उशीरा विवाहयोग येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होऊ शकेल. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. पण येथील नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक होणार असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. बाहेरील उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. जपा. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून ज्या मंडळींचे बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र आहे अशा मंडळींना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शासकीय नोकरदार मंडळींपैकी काहींना बढती मिळणे संभवते. स्वतंत्र व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संततीविषयक एखादी चिंता त्रस्त करील. त्याशिवाय शासकीय नोकरीत जे अधिकारी असतील त्यांना आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करण्याची तीव्र इच्छा उत्पन्न होईल. पण इच्छापूर्तीचा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी " ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतू व मंगळ असे दोन ग्रह असून मंगळामुळे या राशीच्या मंडळींच्या कौटुंबिक सुखात गैरसमज, वाद, भांडणे, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. केतूमुळे कोणाशीही पटणार नाही, एखादी चिंता त्रस्त करील व तो विषभयकारक असल्याने खाण्यापिण्यात सावधानता बाळगणे अगत्याचे होईल. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत जात आहे. या पंचम स्थानी प्रथमपासून रवि व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. मंगळामुळे मुलांपैकी कोणाच्या अयोग्य आचरणाचा मनस्ताप त्रस्त करील. . काही मंडळींना अनारोग्याचा त्रास त्रस्त करील. रविमुळे नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनारोग्य होण्याचीही शक्यता आहे. प्रिय जनांपैकी कोणाच्या दूरत्वामुळे मन अस्वस्थ होईल. शुक्रामुळे

आवडत्या कलाक्षेत्रात प्रगती करणे शक्य होईल व त्यामुळे सुखसमाधान लाभेल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल हितशत्रू पराभूत होतील. या षष्ठ स्थानी मकर राशीत बुध व शनि असे दोन ग्रह आहेतच. बुधामुळे स्त्री,संततीपासून मनस्ताप, भय सहन करावे लागण्याची शक्यता आहे. बुद्धी मंद होईल. शनीमुळे मनस्थिती व्यवहारी, संशयी, स्वार्थी होणे संभवते. पण हा शनि चिकाटीचा गुण देईल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. विवाहेच्छूना विवाह योग येईल. अर्थलाभ होईल, नवे स्नेहसंबंध जुळून येतील. प्रवासयोग येणेही शक्य आहे. मात्र नेपच्यूनमुळे काहीही करणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. तसेच शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनूकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे नोकरीत अधिकार पद मिळू शकेल. काही मंडळींचा सन्मान होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीविष्णुची उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना

मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी " ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र

पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:"तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतू व मंगळ असे दोन ग्रह असून हा केतू मानसिक दुःखकारकच होईल. पण या राशीच्या व्यापारी मंडळींना लाभदायक होईल. या स्थानी स्वराशीत असलेला मंगळ शुभ होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तृत्व घडेल. पण त्याच्यामुळे एखादी दुखापत होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत रवि व शुक्र असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात तृतीय स्थानी असलेला मंगळ या चतुर्थ स्थानी धनु राशीत येत आहे. येथील मंगळामुळे महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखात बाधा निर्माण

होतील. कौटुंबिक जीवनात वाद, गैरसमज, भांडणे होणे संभवते. तसेच असमाधानकारक घटना घडण्याची शक्यताही दिसते. जपा. रविमुळे अनारोग्य, दुःख, कार्यदिरंगाई होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. त्याशिवाय कौटुंबिक त्रास होणेही शक्य आहे. पण शुक्र ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या ज्या मंडळींकडे शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल. ऐषाराम मिळेल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत जात आहे. त्यावेळी तो प्रतिकुलच असेल. त्याच्यामुळे नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. अनारोग्य होईल, मुलांपैकी कोणाच्या आजाराची चिंता त्रस्त करील. प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होईल. या पंचम स्थानी प्रथमपासून बुध व शनि असे दोन ग्रह आहेतच. बुधामुळे बुद्धी मंद होईल, एखादे भय त्रस्त करील व स्त्री, संततीपासून मनस्ताप होणे संभवते. शनिमुळे चिकाटीचा गुण प्रबळ होईल. पण मन व बुद्धी स्वार्थी, व्यवहारी, संशयी होणे संभवते.
या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे काही मंडळींना घरी नोकरचाकराचे सुख मिळेल. तसेच आरोग्य उत्तम राहील. नेपच्यूनमुळे काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करील. काही मंडळींना फसवणूक झाल्याची चिंता त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून तो प्रतिकुलच असेल. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून दुर्गादेवी स्तोत्राचे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः” तारक मंत्राचा, ज्याचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः”तारक
मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत मंगळ व केतू असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे
अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा पार करावयाचा याची चिंता त्रस्त करील. देणे द्यावेच

लागेल, पण येणे मात्र प्राप्त होणे अनिश्चित असेल. उष्णताविकार बळावतील व त्यामुळे घसा, मान, दाढा यांचे दुखणे त्रस्त करील. डोळ्यात खुपऱ्या वाढण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत जात आहे. त्यावेळी तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल. प्रवासयोग येईल. हातून कर्तृत्व घडेल. केतूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात पूर्णपणे अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, धनलाभ होईल, तुमच्या कार्यकुशलतेवर वरिष्ठ प्रसन्न होतील, त्यामुळे सुखसमाधान लाभेल. काही मंडळींना बढती, काहींना अधिकार पद मिळेल तर क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य होणे, आर्थिक चिंता होणे, कौटुंबिक सुखात बाधा येणे व त्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण बुधामुळे मित्रसुख, गृहसौख्य मिळणार असले तरी धननाश होण्याची शक्यताही आहे. तसेच येथील शनिमुळेही गृहसौख्य हानी होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस अनुकुल होईल, अर्थलाभ होईल, प्रेमसंबंध वाढतील, व सर्व सुखाचेच होईल. पण नेपच्यूनमुळे . मनस्थिती अति भावनाशील होणे संभवते. अध्यात्मात रस असणारांना
उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल, तसेच गूढ संशोधन कार्यात यश मिळेल. या राशीच्या
सप्तम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनात पतिपत्नीत गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. कोणाच्या लहरी, विक्षिप्त आचरणाचा त्रास सहन करावा लागेल. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी गैरसमज, वाद, मतभेद आदी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे वाद, भांडणे होतील, नियोजित कामात अडथळे निर्माण होतील, अचानक दुर्घटना होणे, फसवणूक होणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. म्हणून . दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा,

ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी " ओम इंद्राग्रये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत मंगळ व केतू असे दोन ग्रह असून येथील मंगळ स्वराशीत असला तरी त्याचा मूळ स्वभाव हट्टी, दुराग्रही, मानापमान फार असणारा असा असल्यामुळे या राशीची मंडळी अकारण श्रम, दगदग करतील व मनासारखे काही झाले नाही तर संतापून रागाच्या भरात काहीही करतील. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना हा मंगळ प्रतिकुल असल्यामुळे त्यांनी मन व बुद्धी शांत ठेवून संयम राखून व सहनशील बनून आचरण करावे. तेच सुखाचे होईल. मंगळासह असलेल्या केतूमुळे सुखसमाधान लाभेल; पण त्याच्यामुळे वाहन अपघात होणे संभवते. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी धनु राशीत जात आहे. या धनस्थानी रवि व शुक्र असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील रवि व उत्तरार्धात मंगळ या दोन्ही ग्रहांमुळे सम्पूर्ण महिन्याच्या काळात आर्थिक चिंता करावी लागेलसे दिसते. त्यामुळे वाद, भांडणे होणेही संभवते. तसेच शारीरिक उष्णता भडकून अनारोग्य होणे संभवते. डोळ्याची दुखणी व घसा, मान, दाढा यांचे आजार त्रस्त करतील. पण शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, अर्थलाभ होईल व आर्थिक चिंतेचा भार कमी होईल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी जात आहे. त्यावेळी तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, नोकरीत तुमच्या कामाचे वरिष्ठ कौतुक करतील, अर्थलाभ होईल व काही मंडळींना बढती, काहींना अधिकार पद तर क्वचित कोणाचा सन्मान होणे किंवा कोणास एखादे उच्च मिळणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत बुध व शनि असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच हितशत्रूंचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. शनिमुळे या राशीच्या काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी वा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करीतसे वाटते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; काही मंडळींचे स्थावर खरेदीचे किंवा विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. तसेच येथील नेपच्यूनमुळे घरगुती परिस्थितीत घोटाळे, गैरसमज निर्माण होण्याची शक्यता दिसते.

या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती चंचल, अस्थिर होईल, काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांनी सतत खोल विचार करत बसू नये. मेंदूला विश्रांती द्यावी. नपेक्षा काही मंडळींना डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. पण हा हर्षल दशम या व्यवसाय स्थानास पोषक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होईल. तसेच त्याच्यामुळे मनात कपटी विचार प्रबळ होतील. वाममार्ग धन प्राप्त करण्याची इच्छा प्रबळ होईल. जपा. श्रद्धा असेल तर शिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती आणि मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्म नक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि व शुक्र असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी असलेला मंगळ या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत येत आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हे रवि - मंगळ दोन्ही ग्रह अनारोग्यकारक होतील. रविमुळे कसली तरी चिंता त्रस्त करील व त्यामुळे मनस्ताप होऊन रक्तदाब वाढणे, थकवा येणे, हृदयविकार होणे अशापैकी आजार होणे संभवते. मंगळामुळे मानहानी होणे, काही मंडळींना स्त्री-वर्गाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. वाद, भांडणे यांचा मनस्ताप सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात स्वाभाविक दोषामुळे व हट्टीपणामुळे अकारण श्रम, दगदग होण्याची शक्यता आहे. तसे झाले तर अनारोग्य होणेही शक्य आहे. विशेष करून या राशीच्या नोकरदार मंडळींना अधिक मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या धनस्थानी मकर राशीत बुध व शनि असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लग्नस्थानी असलेला रवि या राशीच्या धनस्थानी येत आहे. बुधामुळे काहीतरी दुःख सहन करूनच अर्थलाभ होणे सांभवते. शनिमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. आर्थिक चिंता त्रस्त करील. रविमुळे आर्थिक चिंतेबरोबरच

नेत्रविकार त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरूमुळे प्रवासयोग येईल, या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल, पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल, पण अध्यायाची आवड व गूढ संशोधनात रस असणारांना हा नेपच्यून अनुकुल व यशदायी होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे या राशीच्या क्वचित कोणास अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होण्याची शक्यता आहे. तसेच उच्च बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना हा हर्षल अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल; .पण त्याच्यामुळे मनस्थिती चंचल होईल व अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. मुदतीचा ताप येणे, डोकेडखी, मेंदूविकार अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या केतूमुळे स्वभाव लहरी, विक्षिप्त असा होणे संभवते. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून, श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निऋतये नमः:” तारक मंत्राचा , ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ओम उदकाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम {लग्न}स्थानी याच राशीत बुध व शनि असे दोन ग्रह असून शनि स्वतः:च्या स्वामित्वाच्या राशीतच आहे. त्याशिवाय महिन्याच्या उत्तरार्धात व्ययस्थानी असलेला रवि या प्रथम स्थानी येत आहे. येथील शनीमुळे व महिन्याच्या उत्तरार्धात या स्थानी येणाऱ्या रविमुळे वातविकार व उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच येथील शनीमुळे नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. तसेच कुटुंबातील कोणाचे दूरत्व निर्माण होणेही संभवते. बुधामुळे धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा अशा प्रकारचे काही घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील .व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. अपेक्षित अर्थलाभ होईल. पण

नेपच्यूनमुळे या सुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे घरात कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुख लाभणार नाही, वास्तुसुखातही बाधा येईल. जपा. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे काहीही कारणाने संततिसुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू कमिशन, दलालीवर व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत मंगळ व केतू असे दोन ग्रह असून त्यांच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. पण या राशीच्या काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होण्याची शक्यता आहे. केतूमुळे स्वभाव चंचल, लहरी होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी रवि व शुक्र असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात लाभस्थानी असलेला मंगळ व्ययस्थानी येत आहे. येथील रवि प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळामुळे मनस्तापात वाढच होईल. .जपा. पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम श्रीविश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु शुभ आहे. त्याच्यामुळे आरोग्य चांगले राहील, बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल होईल. पण नेपच्यूनमुळे मनस्थिती अतिशय कोमल होईल व मानसिक संवेदना अति जलद होतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काही झाले तरी लगेच नैराश्य येईल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना उच्च बुद्धी, कार्यशक्ती,. स्मरणशक्ती व आकलनशक्ती प्राप्त होईल. त्याशिवाय या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे

कौटुंबिक जीवनात त्रास, कटकटी सुरू होतील. शिवाय एखादी अनिष्ट घटनाही घडणेही संभवते. जपा. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतु व मंगळ असे दोन ग्रह असून केतूमुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसा विचारही करू नये. उलट आहे ती नोकरीच मनापासून करावी. असे असले तरी या राशीच्या क्वचित कोणास नोकरीतून बडतर्फ केले जाण्याची शक्यताही दिसून येते. या स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे नोकरीत कामाचा असह्य ताण सहन करावा लागेल. ज्यांचा स्वतंत्र व्यवसाय आहे त्यांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. पण हा मंगळ यांत्रिक तांत्रिक कार्यक्षेत्र असणारांना व औषध विक्रेत्यांना अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत जात आहे. त्या काळात त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे, अति कष्ट परिश्रम करूनच अर्थप्राप्ती होणे अशा घटना घडण्याची शक्यता दिसते. पण येथील मंगळामुळे काही मंडळींना मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी प्रथमपासून रवि व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. महिन्याच्या पूर्वार्धात येथील रवि अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी प्रथमपासून बुध व शनि असे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होणार असून बुधामुळे अनारोग्य, अपयश, मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता आहे . शनि ग्रहामुळे संकटपरंपराच निर्माण होणे संभवते. अशा परिस्थितीत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच अगत्याचे होईल. या काळात सर्व आर्थिक व्यवहार जपून, विचारपूर्वक व सावधानतेने करा. त्याशिवाय अनारोग्य होणे, मानहानी होणेही शक्य आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमंताची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी :“ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(१२) मीन - या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे बुद्धी अति अस्थिर, चंचल होईल व अविचाराने खर्च केला जाईल. तसेच आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान केला जाईल. त्याशिवाय विचित्र आचरण होणेही संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल. हातून पराक्रम व कर्तृत्व घडेल. मन उदार होईल. उत्साह वाढेल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मंगळ व केतू असे दोन ग्रह असून येथील मंगळ स्वराशीत असला तरी त्याच्यामुळे प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. केतूमुळे धूर्त, ढोंगी आचरण घडेल. तसेच संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या दशम स्थानी जात आहे. त्यावेळी या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. काही मंडळींना नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण ज्यांचा यांत्रिकतांत्रिक व्यवसाय आहे अशा मंडळींना आणि औषध विक्रेत्यांना हा मंगळ अनुकुल होईल. या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत प्रथमपासून रवि व शुक्र असे दोन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. त्याच्यामुळे शासकीय नोकरीत असणारांपैकी काही मंडळींना बढती, काहींना मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पदही मिळू शकेल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर आर्थिक लाभ होतील. या लाभस्थानी प्रथमपासून बुध व शनि असे दोन ग्रह आहेतच. येथील बुधामुळे सुखसमाधान लाभेल. मित्रलाभ व धनलाभ होणे संभवते. येथील शनि साधारण शुभ फळेच देईल. त्याच्यामुळे अर्थलाभ होईल; पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्यय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. सामाजिक कार्याची आवड असणारांना समाजकार्यात प्रगती करता येईल. पण कौटुंबिक सुखाचे दृष्टीने तो प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. येथील नेपच्यून गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना उपयुक्त होईल. पण त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना मानसिक व्यग्रता व चिंता त्रस्त करतील व त्यामुळे नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी

स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी अहिर्बुध्न्याय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====oooooOooooo=====